**Indian Streams Research Journal**
Vol-1 Issue-9/Octomber-2011
**ISSN: 2230-7850** Available online www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# गुलाबराव महाराज आणि मधराद्वैत संप्रदाय

अरविंद देशमुख
सहयोगी प्राध्यापक
गो.सी.टोंपे
कला वाणिज्य व व़िज्ञान महाविद्यालय
सांदूरबाजार अमरावती

श्री गुलाबराव महाराज यांनी अध्यात्म व सामाजिक क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. त्यांनी लौकिक अर्थाने जैन, शीख, महानुभाव याप्रमाणे नवीन संप्रदाय स्थापन केला नाही. तर या संप्रदायाची परंपरा श्री ज्ञानेश्वरी मध्ये दिली तीच आहे. मधुराद्वैत संप्रदाय हा नाथ संप्रदायातील एक उपशाखा मानली जाते. तरी मधुराद्वैत संप्रदायाच्या माध्यमातून आपल्या अनुयांयासाठी नियम व जीवनपध्दती त्यांनी निश्चित केली होती.

## संप्रदाय कशासाठी ? याबाबत गुलाबराव महाराज यांची भूमिका

श्री गुलाबराव महाराज यांनी संप्रदाय कशासाठी ? याबाबतची भूमिका मुकुंदराजाच्या श्लोकाच्या आधारे स्पष्ट केली आहे.

" संप्रदायाची वाट । न धरोनी करसील प्रगट ।
गुज घेवोनि चावट । होतील बहु ।। मुकुंदराज,
ऐसे मुकुंदराज बोलती । आणि भगवंताचीहि उक्ति ।
ते साच वाटे आम्हा प्रति । कळती ते उपपत्तिहि सांगतो आम्ही ।। 83 ।।
ज्ञान झलियावरी । परंपरा कर्तव्य शिष्य करी ।
संप्रदाय नसती करी । परी भोग भिकारीसम याची ।। 84 ।।"

**मधुराद्वैत संप्रदायः**

गुलाबराव महाराज यांनी कात्सायनी उत्सवाने मधुराद्वैत संप्रदायाचे बीजारोपण केले. पुढे दरवर्षीच्या विविध उत्सवांनी व उपासनेनी त्याला खतपाणी घालून या रोपटयाचे वटवृक्षात रुपांतर केले. भगवान श्रीकृष्ण मधुराद्वैत संप्रदायाचे आराध्यदैवत आहे. वारकरी संप्रदायात पंढरपूरला जसे महत्व आहे तसे मुधराद्वैत संप्रदायात वृंदावनला महत्व आहे. कारण यात

श्रीकृष्णाने पतीरुपाने असून माधुर्यभक्तीची भावना प्रमुख असल्यामुळे वृंदावन हेच सासर झाले आहे. त्यामुळे ही वारकरी संप्रदायाची शाखा असूनही वृंदावनाकडे तिचा ओढा जास्त आहे. एवढाच वारकरी संप्रदायापेक्षा या संप्रदायाचे विशेष आहे. या संप्रदायात गृहस्थाश्रमाचा आग्रह आहे. भगवान श्रीकृष्णाच्या प्राप्तीतच अविनाशी परमानंदाची प्राप्ती, जगतातील सर्व प्रेमाची नाती त्यांच्याशी जोडल्यास अनायासेच होऊ शकते, असा या संप्रदायाचा सिध्दान्त आहे. या भक्तिमार्गाचा अधिकारी कोण असा उध्दवाने श्रीकृष्णाला प्रश्न केला असता श्रीकृष्णाने संसारी माणूस अधिकारी असल्याचे उध्दवला उत्तर दिले आहे. प्रेम हे कोणत्या तरी नात्यानेच होत असते व प्रेमाच्या सर्व नात्यांचा अनुभव संसारी माणसाला असतो तितका ब्रम्हचारी किंवा संन्याशी माणसाला नसतो असे श्रीकृष्णाने नमूद करुन त्याचे कारणही सांगितले आहे. त्यामुळे या मधुराद्वैत संप्रदायात ब्रम्हचारी किंवा संन्यासी यांना स्थान नाही.

श्री गुलाबराव महाराजांनी स्थापन केलेला मधुराद्वैत संप्रदाय पूर्णपणे वैदिक असून पौराणिक तत्वज्ञानाला अनुसरुन आहे. आजच्या परिस्थितीला अनुरुप असे व्यवस्थित रुप देवून श्री गुलाबराव महाराजांनी हा संप्रदाय प्रवृत्त केला. आदिनाथ शंकर, मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ, गहिणीनाथ, निवृत्तिनाथ व ज्ञानेश्वर महाराज अशी त्यांची गुरुपरंपरा असल्याने हा शुध्द नाथ संप्रदाय असून उपास्यत्वे करुन वारकरी संप्रदायाची एक शाखा आहे. गुरुस्थानी श्री ज्ञानेश्वर महाराज आहेत. कैलास हे माहेर आहे, त्याचा आळंदीशी समन्वय, व्रज हे सासर व शेवटी सासर- माहेरचा अभेद हे या संप्रदायाचे ध्येय आहे.

## मधुराद्वैत संप्रदायाच्या अनुयायासाठी आचारसंहिता

श्री गुलाबराव महाराजांनी आपल्या अनुयायांना प्रगतीपथावर आरुढ करण्याकरिता ते कांही नीतिनियमांच्या मर्यादा घालून देत होते. आळंदीची वारी, कात्सायनी महोत्सव, एकादशी, सोमवार, गुरुवार व शिवरात्र हे उपवास, हरिपाठाचा पाठ इत्यादी गोष्टी त्यांनी प्रथम सुरु केल्या व काटेकोरपणे त्यांचे पालन केले. 'संप्रदाय - सुरतरु' हा प्रचंड ग्रंथ सांप्रदायिकांच्या मार्गदर्शनासाठी लिहून ठेवला. या ग्रंथात अनुयांयाच्या पारमार्थिक प्रगतिसाठी तर त्यात असंख्य सूचना आहेतच पण त्याशिवाय अंगणात कोणती उपयुक्त झाडे लावावीत इथ पासून तो पुरुषाने स्त्री शी व्यवहार करतांना कसे वागावे इत्यादी प्रापंचित बाबी विस्ताराने विवेचिल्या आहेत. श्री गुलाबराव महाराजांनी संप्रदायांच्या अनुयायासाठी कडक नियम ठेवले आहेत. नपुंसक, रोगी, वृध्द, अत्यंत दरिद्रि, बायकोला जेवू घालू न शकणारा आणि समाधी साधलेला हिमालयस्य योगी याशिवाय सर्वांनी विवाह केचा पाहिजे असा श्री गुलाबराव महाराजांचा आग्रह आहे. ब्रम्हचर्याचे पालन उत्तमच पण ते नवराबायको या दोघांनी मिळून पाळावे पण अविवाहीत राहू नये. स्त्री विषयक कडक नियम ठेवावेत पण स्त्रीशिवाय म्हातारपणी सुध्दा राहू नये असे श्री महाराज म्हणतात. आपल्या मनावर विश्वास ठेवू नये तर प्रयत्नांवर विश्वास ठेवावा, अशाप्रकारचे बाहय आचारापेक्षा आंतरवैराग्य मिळविण्यासाठी

त्यांनी प्रयत्न करण्यास सांगितले आहे. या विवाह विषयक नियमातून श्री महाराजांची वस्तुनिष्ठ दृष्टी व्यक्त होते. सामान्य मनुष्याची पतनशीलता दिसत असूनही अनेक संप्रदायात ब्रम्हचर्य आणि बाहयसंन्यासाला महत्व आहे. त्यामुळे त्यांचा अधिकार मनोनिग्रहसंपन्न अशा श्रेष्ठ व्यक्तीसाठीच आहे असे म्हणावे लागते. पूर्वीच्या वारकरी पंथातील संतांनी देखील गृहस्थाश्रमावरच भर दिलेला आहे. श्री महाराजांनी त्यामुळेच संप्रदायिकांसाठी गृहस्थाश्रमच मान्य केला आहे. सुरुवातीला वैराग्याच्या भरात संन्यास घेणे सोपे आहे. पण सातत्याने यम नियमांचे पालन करणे अवघड आहे म्हणून श्री गुलाबराव महाराजांनी पतनशीलता कमी करणारा आत्मवैराग्य साधून देणारा गृहस्थाश्रमाचा नियम आपल्या संप्रदायात करुफन ठेवला आहे. यासोबतच ते ज्ञानेश्वर माऊलीला आर्शीवाद मागतात तोही लक्षणीय आहे.

" सपुत्र सधन होवोत का जन । मिळोनी भजन करावया ।। "

श्री गुलाबराव महाराज म्हणतात, भगवत्सेवेच्या आड येणाऱ्या सर्वाचा संन्यास करावा आणि भग्वत्सेवेस साधक होईल असा संसार वाढवावा.

" जे जे आड येई भगवत्सेवेस । त्याचा त्याचा करावा संन्यास ।
जे जे अनुकूल होईल हरिसेवे । तो तो संसार वाढवावा ।। 57 ।।
मुख्य धरावी भगवतश्क्ती । गौण करावी प्रपंचासक्ती ।। 54 ।।
परी कालीमाजी सकुटूंबाची घ्यावे नाम ।
जंव न जिंकवती क्रोध काम ।
तंव संसारी राम भजावा ।। 53 ।।"

या प्रकारच्या मध्यममार्गाचा उपदेश करुन सामान्यजनांच्या उध्दाराचा मार्ग श्री गुलाबराव महाराजांनी आपल्या संप्रदायात सांगून ठेवला आहे.

दैववाद व प्रयत्नवादाच्या बाबतीत संताबद्दल बरेच गैरसमज आहेत. त्यासंबंधी श्री गुलाबराव महाराज म्हणतात की, " शास्त्रात सांगितलेला दैववाद मागे होऊफन गेलेले दु:ख विसरण्यासाठी प्रतिपादन केलेला आहे. पुढे येणारे दु:ख नाहिसे करण्यासाठी प्रयत्नच केला पाहिजे असे व्यवहारात वागावे."

परमार्थासाठी मात्र अर्थार्जन व विषयेच्छा दैवावर सोडून द्याव्यात. त्याप्रयत्नाने साध्य होतील, नाही असे नाही म्हणून मुमुक्षूने मानव जन्मापासून फायदा करुन घेण्यासाठी अर्थार्जन व कामसेवन दैवावर सोडून धर्म व मोक्ष या दोन पुरुषार्थासाठी कंबर कसून प्रयत्नाला लागावे.

" प्रारब्धवाद सांडावा । अंतरी ब्रम्हप्रयत्न मांडावा ।
देहा हंकारभाव दंडावा । खंडावा क्रोधू ।।"

असे व्यावहारिकाला आणि पारमार्थिकाला दोघांनाही दाखवून दिलेले दैव-प्रयत्नांचे दोन प्रकारचे समन्वय मार्मिक आणि वैशिष्टयपूर्ण आहेत.

श्री गुलाबराव महाराज यांना कोणी रिकामे बसलेले आवडत नसे. आळशी मनुष्यासाठी त्याचा तमोगुण घालविण्यासाठी कोणताही भलता उपाय योजावा पण कर्मप्रवृत्त करावे. असे गुलाबराव महाराजांचे मत होते याबाबत ते म्हणतात की,

" निश्चये माझिया संप्रदायी ।
द्वाड एक तो जो रिकामा राहील ।
ज्ञानी व धर्मी व सुखार्थ स्वपरदेही ।
श्रमत जावे ।। 564 ।।"

तसे पाहिले असता प्रत्येकानी आत्मज्ञानासाठी अविश्रांत श्रम करीत रहावे. ते होत नसेल तर धर्मासाठी तरी धडपड करावी आणि तेही शक्य नसेल तर स्वतःच्या दैहीक सुखासाठी कां होईना श्रम करीत जावे. पण रिकामे राहून द्वाड होऊ नये. अशा कडक शब्दात श्री गुलाबराव महाराजांनी आपल्या सांप्रदायिकांना बजावून सांगितले आहे.

## मधुराद्वैत संप्रदाय व समन्वयवाद

आधुनिक वैज्ञानिक तंत्रयुगात लहानापासून थोरांपर्यंत, अशिक्षितांपासून विद्वानापर्यंत, गरिबापासून श्रीमंतापर्यंत, कोणत्याही धर्माचा, भाषेचा व देशाचा मुमुक्षू असो, सर्व प्रकारच्या समाजासाठी या संप्रदायाची स्थापना करुन श्री महाराजांनी आचार विचारांची सुलभ मांडणी केली आहे. या संप्रदायातील शास्त्रशुध्द तर्कनिष्ठ विचारांच्या अधिष्ठानावर आचाराचा सोपान कुणीही जिज्ञासू, क्रमशः चढू लागल्यास जीवमृत्यूच्या अंतिम पायरीवर तो आज ना उदया आरुढ झाल्याशिवाय राहणार नाही. वेदांत तत्वाज्ञानाचे द्वैत, अद्वैत, विशिष्ट द्वैत वगैरे नाना प्रकारचे संप्रदाय आहेत. त्या सर्वांतील तत्वज्ञान परस्पर भिन्न आहे. त्यात आणखी एक संप्रदाय कशाला हवा ? असे मनात येणे स्वाभाविक आहे. परंतू वेदांतातील शुध्द ब्रम्हस्थितीचा अनुभव करुन देण्यासाठी ऋषी मुनींच्या द्वारा परमेश्वरानेच जगातील सर्व संप्रदाय प्रवृत्त केले आहेत. लोकांचा अधिकार भिन्न असल्यामुळे भिन्न भिन्न मार्गाची आवश्यकता असते. ते मार्ग म्हणजे भिन्न भिन्न संप्रदाय होत. म्हणून हजारो लोकांचा उध्दार होण्यासाठी हजारो संप्रदाय निघाले तरी त्यात वावगे कांही नाही. परंतू त्यात परस्पर द्वेष उत्पन्न होणे, हे मात्र हानिकारक आहे. त्यांचा समन्वय समजून घेऊफन द्वेष नाहिसा केला पाहिजे. सामन्वय केल्यानंतरही प्रत्येक संप्रदायाच्या लोकांना स्वतःचा संप्रदाय निष्ठेने पाळण्याचे स्वातंत्र्य कायम असते. असा श्री गुलाबराव महाराजांनी समन्वयवादाबाबत विवेचन केले आहे.

## मधुराद्वैत संप्रदायाचा प्रसार

श्री गुलाबराव महाराजांनी कात्यासनी उत्सवाने मधुराद्वैत संप्रदायाचे बीजारोपण केले होते. त्यानंतर दरवर्षीच्या विविध उत्सवांनी व उपासनेनी त्याला खतपाणी घालून लवकरच या रोपटयाचे वटवृक्षात रुपांतर केले. सहज भगवद् गुण वर्णनाच्या आवडीने व सहिनादाच्या उत्कंठतेने प्रेरित झाल्यामुळे परोपराकारैक परायण होऊन श्री महाराज सहकुटूंब बाहेर पडले व

त्यांच्या कार्यास विस्तृत क्षेत्र मिळू लागताच त्यांचे अलौकिक सामर्थ्य, शास्त्र रहस्यज्ञान व दैवी शक्ती सिध्द विद्वत्ता प्रगट होऊन संप्रदाय वृध्दी झपाटयाने होऊ लागली. येणाऱ्या मंडळींना ज्ञानेश्वरी व हरिपाठाचा प्रसाद देऊन तिच्या नित्य पठणाक्ष्या शक्य तेवढा प्रसार करण्याच्या प्रयत्नांमुळे भाविकजनांचे इहपर लोकांचे कल्याण होऊ लागले. श्री महाराजांनी इ.स. 1907-08 साली मधुराद्वैत प्रतिपादक वाङःमय निर्माण करुन त्याचा विशेष प्रसार करण्याची आपली उत्कट इच्छा प्रगट केली होती. त्यांच्या शिष्य मंडळींनी श्री महाराजांच्या या इच्छेच्या पूर्तीसाठी त्यांच्याच संमतीने नागपूर येथे श्री ज्ञानेश्वर प्रासादिक मुद्रणालयाची स्थापना केली. श्री ज्ञानेश्वर प्रासादिक मुद्रणालयाची स्थापना केली. श्री महाराजांचे भक्तिपदतीर्थामृतादि ग्रंथवाङःमय सुक्तिरत्नावली या नावाच्या ग्रंथद्वारा अनेक भागात या मुद्रणालयातून प्रसिध्द केले. मधुराद्वैत संप्रदायाचा प्रसार करण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनी पाळावयाच्या असलेल्या आज्ञांचे एक पत्रक श्री महाराजांनी लिहून काढले व प्रत्येकाने या नियमांचे पालन करावे अशी त्यांची अपेक्षा होती

**सारांश :**

एकूणच श्री गुलाबराव महाराजांचा मधुराद्वैत संप्रदाय हा पूर्णपणे वैदिक आहे. शांकराद्वैत व हरिहरभक्ती यावरुन नाथपंथ व वारकरी पंथ यांचीच ही एक शाखा असल्याचे दिसून येते. यातील उपास्य-पंचायतन, तीर्थक्षेत्रे , उत्सव प्रयत्न प्रशंसा आणि गृहस्थाश्रमाचा विलक्षण आग्रह लक्षात घेतला असता हा लोकाभिमुख संप्रदाय मुमुक्षूपासून ज्ञानीभक्तांपर्यंत सर्वांना स्वीकारणीय आहे. यात माधुर्यभक्ती ही सर्वश्रेष्ठ व ध्येयरुप असली तरी तिचा अधिकार आत्मज्ञान संपन्न व्यक्तीसाठीच मर्यादित आहे. ज्ञान होण्यापूर्वी स्त्रियांनी वात्सल्यभक्ती व पुरुषांनी दास्य किंवा लालनभक्ती याच उपासना म्हणून स्वीकाराव्या असा श्री गुलाबराव महाराजांनी दंडक घालून दिला आहे. असा नियम न पाळल्यामुळे इतर कांही संप्रदायात माधुर्यभक्तीचा नावाखाली अनेक विकृती आढळून येतात. तसे होऊ नये म्हणून श्री महाराजांनी केलेली योजना त्यांची दूरदृष्टी व्यक्त करते. त्यांनी लिहिलेले ग्रंथ हीच मधुराद्वैत संप्रदायाची अक्षय संपत्ती असून त्याच एका आधारावर हा संप्रदाय पुढेही अनंतकाळ टिकून राहील असे वाटते.

**संदर्भ :**

1) साधुबोध, श्री गुलाबराव महाराज, विरचित प्रकाशकः श्री गुलाबराव महाराज सर्वोदय ट्रस्ट, आळंदी
2) प्रज्ञाचक्षु श्री गुलाबराव महाराज यांचे विचार वैभव, प्रकाशक :भारतीय विचार मंच, नागपूर
3) नित्यपाठ, प्रकाशयः श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, अमरावती
4) नित्यतीर्थ आळंदी महिमा श्री गुलाबराव महाराज प्रकाशकः पंचलतिका ग्रंथन्या, मुंबई

5) मधुराद्वैताचार्य, समन्वय महषी श्री गुलाबराव महाराज यांचे उत्तराधिकारी श्री बाबाजी महाराज पंडित जन्मशताब्दी प्रकाशन, नागपूर

6) मधुराद्वैताचार्य, श्री गुलाबराव महाराज अवतार व कार्य, ले.डॉ.अ.स.जोशी, चैतन्य प्रकाशन, नागपूर

7) संप्रदाय सुरतरु, उत्तरार्ध, श्री गुलाबराव महाराज प्रकाशक : मधुरादर्शन ट्रस्ट, नागपूर

प्रीतिनर्तन, संत श्री गुलाबराव महाराज, प्रकाशकः स्कंददास स्मारक ग्रंथ न्यास, मुंबई